हिंगोली.

दिनांक :— ०४.०६.२०१९

## प्रेसनोट

**लोकसेवक श्री विजय राधेशाम अग्रवाल, वय ४२ वर्ष, कंत्राटी कार्यकारी अभियंता, (इतर लोकसेवक) समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद हिंगोली. रा. श्रीनगर, हिंगोली यांनी ५,०००/—रू. ची लाच स्विकारल्यावरून त्यांना ताब्यात घेतले बाबत...**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक ०३.०६.२०१९ रोजी तक्रार दिली होती की, कळमनुरी पंचायत समिती अंतर्गत झालेल्या जिल्हा परिषदचे ०३ शाळांचे ०७ बांधकामाचे मोजमाप पुस्तीका/(एम.बी.) वर व कामपूर्णत्वाचे दाखल्यावर सही देण्यासाठी लोकसेवक अग्रवाल, कंत्राटी कार्यकारी अभियंता, समग्र शिक्षा अभियान, जिल्हा परिषद हिंगोली हे ५,०००/— रूपयांची लाचेची मागणी असल्याबाबत अॅ.क.ब्युरो हिंगोली कार्यालयात तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक ०३.०६.२०१९ रोजी तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करण्यात आली असता लोकसेवक अग्रवाल कंत्राटी कार्यकारी अभियंता यांनी तक्रारदार यांना ५,०००/— रू. ची लाचेची मागणी केली होती. त्यावरून दिनांक ०४.०६.२०१९ रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान लोकसेवक अग्रवाल, कंत्राटी कार्यकारी अभियंता यांनी जिल्हा परिषद कार्यालय हिंगोली येथील त्यांचे कक्षात तक्रारदाराकडून दुपारी १२.०२ वाजताचे सुमारास लाचेची रक्कम स्विकारली. त्यावरून लोकसेवक अग्रवाल यांना लाचेच्या रकमेसह रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच पुढील कारवाई सुरू आहे.

ही कामगिरी मा. श्री. संजय लाटकर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी पोलीस निरीक्षक जितेंद्र पाटील, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोना श्री संतोष दुमाने, पोना महारूद्रा कबाडे, पोना श्री विनोद देशमुख, पोशि श्री प्रमोद थोरात, पोशि श्री अविनाश किर्तनकार, चापोना श्री बामनीकर अॅ.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने यशस्वीपणे केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल अॅप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.—१०६४**, दुरध्वनी क्र.०२४५६—२२३०५५,

**मोबाईल क्रमांक :—** ९८२३२१५१९५, ९९२००४९२३२ व ९९२३०४२५६५.

Scanned by CamScanner